# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि./१०५७/२०२० दिनांक: २२/१०/२०२०

## परीपत्रक

विषय:— घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षक मान्यतेबाबतच्या प्रस्तावाबाबत.

संदर्भ:— शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३, दि. १४/११/२०१८

महोदय,

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२०—२१ करीता घडयाळी तासिका तत्वावर शिकविणाऱ्या शिक्षकांची निवड करतांना घडयाळी तासिका बाबत महाराष्ट्र शासनाकडून दि. १४ नोव्हेंबर २०१८ ला प्रकाशित करण्यात आलेल्या शासन निर्णयाचे अवलोकन करून त्याप्रमाणे कार्यवाही घ्यावी. विद्यापीठाने सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार संपुर्ण कागदपत्रासह घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षक मान्यतेबाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करावे.

तसेच सदर बाबी संबंधीचा प्रस्ताव अपुर्ण असल्यास त्या प्रस्तावावर विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही घेतली जाणार नाही व त्यासंबंधीची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांची राहील. करीता नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये

(डॉ. व्ही. सी. सिलारे)
उपकुलसचिव (प्र.)
महाविद्यालय विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## प्रपत्र

विषय:— सी.एच.बी. शिक्षक मान्यतेकरीता आवश्यक दस्ताऐवज.

संस्थेचे नांव:——————————————————————

महाविद्यालयाचे नांव:————————————————————

| अ. क्र | सोबत लागणारे दस्तावेज | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | संस्थेच्या लेटर हेडवर प्रस्ताव सादर करावा. | |
| २ | संस्थेने दिलेला नियुक्ती आदेश सादर करावे. | |
| ३ | उमेदवाराचे रूजु पत्र सादर करावे. | |
| ४ | कार्यभार तक्त्यात (अनेक्झर—सी) मध्ये माहिती सादर करावे. | |
| ५ | उमेदवाराचे १० वी पासुन ते पदव्युत्तर पर्यंत शैक्षणिक कागदपत्रे सादर करावे. | |
| ६ | जातीचे प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ७ | मा. सहसंचालक, नागपुर यांचे पद मान्यता पत्र झेराक्स प्रत सादर करावी. | |
| ८ | कार्यभार विवरण तक्ता प्रपत्र अ व ब मध्ये सादर करावे. | |
| ९ | संस्थेने नियमानुसार वृत्तपत्रात शैक्षणिक अर्हतेच्या तपशिलासह प्रसिध्द केलेली मुळ जाहिरातीची प्रत सादर करणे अनिवार्य आहे. | |
| १० | निवड समितीचा अहवाल व उमेदवारांचे उपस्थिती पत्रक सादर करावे. | |
| ११ | महाविद्यालयाचे वेळापत्रक सादर करावे. | |
| १२ | चालु सत्राचे संलग्निकरण व ना देय प्रमाणपत्र सादर करावे. | |
| १३ | इतर संबंधित प्रपत्रे आवश्यकतेनुसार | |
| १४ | उपरोक्त सर्व प्रपत्रे व दस्ताऐवज प्राचार्य/अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने साक्षांकीत केलेले असणे आवश्यक राहील | |

प्राचार्य/अध्यक्ष/सचिव